# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत

**(१) ३११० (०२-०६-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुळे जाहीर झालेल्या लॉकडाऊनच्या काळात कोकणातील आंबा पिकांची खरेदी/विक्री व निर्यात होत नसल्याकारणाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनच्या काळात निर्यात करणाऱ्या आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले आहे, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाने योजना आखली आहे काय, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त आंबा उत्पादक शेतकऱ्यांना कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१५-०६-२०२२) :** (१) असे निदर्शनास आलेले नाही.

(२) आंबा हंगाम २०२० मध्ये कोरोना प्रादुर्भावामुळे आंबा महोत्सवाचे आयोजन करणे शक्य न झाल्यामुळे आंब्याच्या थेट खरेदी-विक्रीसाठी पणन मंडळामार्फत संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आले. यद्वारे सुमारे ३२५ आंबा उत्पादकांची नोंदणी करण्यात येवून आंबा उत्पादकाची यादी गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांना उपलब्ध करुन देण्यात आली. यामुळे गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, कृषी विभाग, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांचेकडून सुमारे ६५,००० डझन आंबा थेट खरेदी करण्यात आला. तसेच आंबा उत्पादकांना पुणे येथे गोडाऊन व वाहन यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे या ठिकाणाहून सुमारे २२०० डझन आंबा वितरीत करण्यात आला. तसेच कोविड-१९ च्या कालावधीत कृषी मालाची निर्यात सुरळीत रहावी, तसेच निर्यातदारांना येणाऱ्या अडचणी त्वरीत सोडवून त्यांना मदत व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळांतर्गत वाशी, नवी मुंबई येथे विशेष निर्यात कक्ष स्थापन करण्यात आला होता. त्यामार्फत एप्रिल ते मे २०२० मध्ये राज्यातून ११७६० मे.टन एवढ्या आंब्याची निर्यात झाली आहे. तसेच कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बाजार समितीतील व्यवहार सुरळीत ठेवण्यात आले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांचे शुल्क ५० टक्के कमी करण्याबाबत

**(२) ४५५९ (१७-०७-२०२०) श्री.विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊनचा परिणाम मध्यमवर्गीयांवर झाला असल्याने अशा परिस्थितीमध्ये पालक व शिक्षकांचे नुकसान होऊ नये याकरीता राज्यातील शाळांचे शुल्क ५० टक्के कमी करावे तसेच विद्यार्थ्यांची ऑनलाईन शिकवणी बंद करावी अशी मागणी पालकांनी केल्याची माहिती दिनांक १८ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश नागरिकांची नोकरी गेली असून काहींचे वेतन कपात केले असल्याने सर्वच पालकांना मुलांना लॅपटॉप किंवा मोबाईल देणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागणीनुसार कोणती उपाययोजना वा निर्णय घेतला व घेण्यात आला वा येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२७-०५-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) शासनाच्या दिनांक ८ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २६ जून, २०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरिम स्थगिती दिली आहे सदर आदेशाविरूध्द शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) योजना राबविण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) ५४८५ (२६-०५-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये आदिवासींची लोकसंख्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात (TSP) ३५% तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) ६५% आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींची लोकसंख्या TSP मध्ये ३५% असून तिथे विधानसभा सदस्य संख्या २५ आहे तर OTSP मध्ये ६५% आदिवासींची लोकसंख्या असूनही विधानसभेची एकही जागा राखीव नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, TSP पेक्षा OTSP मधील अनेक मतदारसंघात आदिवासींची लोकसंख्या जास्त असूनही तेथे आरक्षण न टाकता ते TSP मध्येच टाकले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, OTSP मध्ये ६५% आदिवासी समाज राहत असूनही त्यांचा एकही प्रतिनिधी विधानसभेत नसल्याने त्यांचे प्रश्न सोडविले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, TSP व OTSP असा भेद न करता OTSP ला विधानसभेत प्रतिनिधित्व देण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०५-२०२२) :** (१) सन २०११ च्या जनगणनेनुसार ५२.११% आदिवासी लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्र (TSP), अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र (ATSP) माडा (MADA) व मिनिमाडा (MINIMADA) क्षेत्रात तर ४७.८९% आदिवासी लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) राहते.

(२), (३), (४), (५) व (६) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद क्र. ३३२ नुसार अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार संघ राखीव करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मतदार संघ निर्माण करणे, आरक्षित करणे याबाबतची कार्यवाही भारत परिसीमन आयोग यांचेमार्फत करण्यात येते. भारत परिसीमन आयोगाची स्थापना केंद्र शासनाव्दारे वेळोवेळी करण्यात येते आणि भारत परिसीमन आयोगाने अधिसुचित केलेल्या मतदार संघानुसार भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून निवडणूकांचे संचलन करण्यात येते.

परिसीमन आयोगाच्या दिनांक ३१ जुलै, २००६ च्या आदेशानुसार राज्यात अनुसूचित जमातीसाठी २५ जागा आरक्षित ठेवल्या आहेत. दिनांक ३१ जुलै, २००६ च्या आदेशानुसार मतदारसंघाचे आरक्षण निश्चित केले आहे. सदर आदेशामध्ये २०२६ नंतर होणाऱ्या पहिल्या जनगणनेपर्यंत बदल करता येणार नाही अशी तरतूद आहे.

आदिवासी विकास विभागाव्दारा आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरही (OTSP) योजना राबविण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

---

## निसर्ग चक्रीवादळामुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांचे नुकसान झाल्याबाबत

**(४) ५६३५ (२३-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या १५५२ शाळा, १३५० अंगणवाडी व खाजगी १८६ शाळांचे निसर्ग चक्रीवादळामुळे सुमारे ५६ कोटींचे नुकसान माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या शाळांसाठी शासनाने रुपये २४ कोटी इतका निधी मंजूर केला असून यापैकी ७ कोटी ५० लाखांचा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत तसेच खाजगी शाळांची, महाविद्यालयांची छप्पर उडून आणि भिंती कोसळून पडझड झाल्याचे दिनांक ३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या शाळांच्या, महाविद्यालयांच्या दुरूस्तीसाठी मंजूर करण्यात आलेला निधी अपूरा असल्याने सदर निधीत वाढ करून देण्यासाठी तसेच अंगणवाड्यांची, शाळांची व महाविद्यालयांची तातडीने दुरूस्ती करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१८-०५-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३), (४) अंशत: हे खरे आहे.

निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण १५५१ शाळांचे नुकसान झाले होते व रुपये २४ कोटी २१ लक्ष इतक्या निधीची मागणी करण्यात आली होती.

राष्ट्रीय आपत्ती निवारण व्यवस्थापन (एनडीआरएफ) च्या निकषानुसार ७३० शाळांच्या दुरुस्तीकरीता प्रतिशाळा रुपये २ लक्ष रुपयांच्या मर्यादेत रुपये १२ कोटी ४८ लक्ष इतका तसेच समग्र शिक्षा अंतर्गत ११७ शाळांच्या दुरुस्तीकरीता रुपये ४ कोटी ४ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील शाळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने व प्रतिशाळा दुरुस्तीसाठी रुपये २ लक्ष मर्यादेतील निधी अपूरा पडत असल्याने उर्वरित निधी जिल्हा नियोजन व जिल्हा परिषद सेस फंडातून उपलब्ध करुन देण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परळ येथील हाफकिन बायोफार्मास्यूटिकल्समध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना कायम स्वरूपी सेवेत समाविष्ट करण्याबाबत

**(५) ८४२४ (१७-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९४-१९९५ पासून परळ येथील हाफकिन बायोफार्मास्यूटिकल्समध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या २२८ कामगारांपैकी १३४ कामगारांना सन २००० पर्यंत कमी करण्यात आले असून उर्वरित ५० कामगारांना वर्षानुवर्षे पाठपुराव्यानंतरही कायम करण्यास हाफकिन व्यवस्थापन टाळाटाळ करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ मध्ये औद्योगिक न्यायालयाने कामगारांना कायमस्वरूपी सेवा ज्येष्ठतेनुसार कामावर घेण्यात यावे असा आदेश दिला असून हाफकिनच्या तबेला युनिटने तबेला क्षेत्र अनुशेष भरतीसाठी सन २०१२ मध्ये दिलेल्या जाहिरातीमध्ये पूर्वीच्या कामगारांना प्राधान्य दिले जाईल असे नमूद करुनही रोजंदारी कामगारांना कायम स्वरूपी कामावर घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रोजंदारी कामगारांनी मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर कामगारांना विनाविलंब कायम करण्याबाबत विचार केला जावा अशा सूचना हाफकिनच्या संचालकांना दिल्या असतानाही त्याची अंमलबजावणी झाली नसून दरम्यानच्या कालावधीत सदरहू ५० पैकी ४२ कामगार हयात असताना, रोजंदारीवर वर्षोनुवर्षे काम करणाऱ्या ४२ कामगारांना कायम स्वरूपी कामावर समाविष्ट न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू ४२ रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना विनाविलंब कायम स्वरूपी सेवेत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (३१-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सन १९९४-९५ पासून परळ येथील हाफकिन बायोफार्मास्युटिकलमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या २२८ कामगारांपैकी १३३ कामगारांना औद्योगिक न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार महामंडळाचे व्यवस्थापन, रोजंदारी कर्मचारी प्रतिनिधीत्व करणारी कामगार संघटना व महामंडळातील मान्यता प्राप्त संघटना यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार होऊन दिनांक ३१/१२/१९९४ पर्यंतच्या रोजंदारीवरील कर्मचारी यांना टप्प्याटप्प्याने वर्ष २००२ पर्यंत महामंडळाच्या सेवेत सामावून घेतले गेले. त्या काळात सेवेत न सामावलेल्या कर्मचाऱ्यांनी युएलपी ७६९/२००० ही याचिका मा.औद्योगीक न्यायालयात दाखल केली. सन २०११ मध्ये याचिकेवर अंतिम निकाल देताना मा.न्यायालयाने महामंडळाकडे भविष्यात जेव्हा तात्पुरत्या स्वरुपाचे काम निर्माण होईल तेव्हा प्राधान्याने रोजंदारी कर्मचाऱ्यांना चक्राकार पध्दतीने त्यांच्या वरिष्ठता यादीप्रमाणे काम द्यावे असा निर्णय दिला आहे. तथापि, मा.औद्योगिक न्यायालयाने उर्वरीत रोजंदारी कर्मचाऱ्यांना महामंडळामध्ये कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

(२), (३) व (४) सन २०१२ मध्ये महामंडळात शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे कायमस्वरुपी पदावर विशेष मागास भरती मोहिम राबविण्यात आली. त्यावेळी महामंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये नमूद केले होते

की, जे इच्छूक उमेदवार सध्या महामंडळात कार्यरत आहे त्यांना त्यांच्या कामगिरीच्या आधारावर प्राधान्य देण्यात येईल. सदर जाहिरातीमधील ज्या पदांना मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाले त्या पदांसाठी तोंडी व लेखी परीक्षा घेण्यात आल्या. त्यामध्ये उत्पादन सहायक, तबेला क्षेत्र सहा. वर्ग अ, लिपिक टंकलेखक, वरीष्ठ कार्यालय सहाय्यक, सहा.अधीक्षक या पदांचा समोवश होता. या पदांसाठी रोजंदारी कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांनी जाहिरातीस अनुसरून अर्ज केले होते व जे अनुभव, जात संवर्ग, शैक्षणिक अर्हता इ. निकष पूर्ण करत होते, त्यांना लेखी परीक्षा व मुलाखतीसाठी पाचारण केले होते.

सन २०१२ मध्ये सदर विशेष भरती मोहिम राबवली त्यानुषंगाने भरती प्रक्रियेनंतर सदर कर्मचाऱ्यांना प्राधान्याने सामावून घ्यावे व सदर भरती रद्द करावी म्हणून संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यांनी युएलपी ३७४/२०१२ ही याचिका मा.औद्योगिक न्यायालयात दाखल केली. मा.औद्योगिक न्यायालयाने दिनांक २२/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार महामंडळाने काहीही अनुचित प्रकार केलेला नाही, असे नमूद करून सदर याचिका फेटाळली असून, युएलपी ७६९/२००० या याचिकेमध्ये सन २०११ मध्ये दिलेला आदेश कायम ठेवण्यात आला आहे. हाफकिन महामंडळाला जेव्हा आवश्यकता असते, तेव्हा ज्येष्ठतेनुसार रोजंदारी कामगारांना कामकाजाकरीता प्राधान्य देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात धार्मिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) ८७८८ (१५-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे धार्मिक अल्पसंख्यांक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाकडून मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम काढण्यासाठी हॅकरने शाळांचे लॉगीन आयडी हॅक करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०२१ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नाशिक जिल्ह्यात धार्मिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करुन संबंधित दोषींना अटक करुन त्यांच्याकडून सदरहू रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२३-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील पाटबंधारे विभागामधील अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) ९६७० (१५-०७-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात पाटबंधारे विभागामध्ये १५६४ पदांपैकी ८६९ म्हणजेच ५५.५५ टक्के अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पदे केव्हापासून रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील निम्म्यापेक्षा जास्त पदे रिक्त असल्याने टेंभू-ताकारी-म्हैशाळ-आरफळ योजनांच्या पाणी वाटप व्यवस्थापनात येत असलेली अडचण टाळण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१८-०५-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. सांगली पाटबंधारे मंडळाअंतर्गत एकूण मंजूर पदे १६०० असून त्यापैकी ९२४ पदे रिक्त आहेत.
(२) सदरची पदे ही वेळोवेळी सेवानिवृत्तीने, मयत, बदलीने, पदोन्नतीने रिक्त झालेली आहेत.

(३) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पदभरती करण्यात येते. त्यानुसार सन २०१५ ते २०२० या कालावधीत गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील अनुक्रमे ३१, ५४, ७० व २१ इतकी पदे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हाफकिन बायोफार्मा कार्पोरेशनमार्फत कोरोना लस निर्मिती प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(८) ९७७४ (१७-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हाफकिन बायोफार्मा कार्पोरेशनमार्फत मुंबईत कोरोना लसीचे उत्पादन करण्याचा रुपये १५४ कोटी खर्चाचा नवीन प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कोरोना लस उत्पादन प्रकल्प सुरु करण्यास मान्यता मिळावी यासाठी शासनाने केंद्र शासनास विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पास केंद्र शासनाची मान्यता मिळाली नसल्यास याबाबत कशाप्रकारे पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे,
(४) असल्यास, सदर कोरोना लस निर्मिती प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत केंद्र शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्यास प्रकल्प सुरु करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, तसेच यासाठी लागणारा निधी केव्हा व कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१९-०५-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळास केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारीतील जैव तंत्रज्ञान उद्योग संशोधन सहायता परिषद (BIRAC) यांचेकडून सदर प्रकल्पास मान्यता मिळालेली आहे.

(४) मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि., हैद्राबाद यांचे कोवॅक्सिन (COVAXIN) लस उत्पादनाचे तंत्रज्ञान वापरून हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई येथे कोविड-१९ लसीचे उत्पादन करणे, याप्रकारचे लस निर्मिती प्रकल्पाचे स्वरुप आहे.

मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि., हैद्राबाद यांचेकडून कोवॅक्सिन लस उत्पादन तंत्रज्ञान हाफकिन महामंडळास हस्तांतरण करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारीतील जैव तंत्रज्ञान उद्योग संशोधन सहायता परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही करण्यात येत आहे. सदर प्रकल्प "टर्न की" तत्वावर उभारण्याची कार्यवाही हाफकिन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने कोवॅक्सिन लस उत्पादित करण्याच्या सदर प्रकल्पास मंजूरी व अर्थसहाय्य करण्याबाबत दिनांक २९ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा प्रकल्प खर्च रुपये १५४/- कोटी आहे. त्याकरीता केंद्र शासनाकडून रुपये ६५/- कोटी इतके अर्थसहाय्य ८ महिन्याच्या कालावधीत ५ टप्प्यामध्ये हाफकिन महामंडळास उपलब्ध होणार आहे. तसेच राज्य शासनाकडून रुपये ९४.१६६५/- कोटी रक्कमेचे अर्थसहाय्य हाफकिन महामंडळाला बीज भांडवल स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मंजूर निधीचे वितरण प्रकल्पपुर्तीच्या टप्प्यानुसार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हाफकिन संस्थेमार्फत औषध निर्मिती व संशोधनाचे प्रकल्प राबविण्याबाबत

**(९) ९७७५ (१७-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन इन्स्टिटयुटच्या कामकाजात चांगली प्रगती व्हावी यासाठी राज्य शासनास शिफारशी करण्यासाठी नामवंत शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकार समितीने औषध निर्मिती आणि संशोधन यासाठीचे रुपये ११०० कोटी खर्चाचे हाफकिन इन्स्टिटयुटमार्फत पाच मोठे प्रकल्प राबविण्याची शिफारस माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व त्यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व प्रत्यक्षात यापैकी किती निधी केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्प राबविण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१९-०५-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनाने सन २०१७ साली नामवंत शास्त्रज्ञ डॉ.आर.ए.माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीने महामंडळाचा सर्वांगीण विकास कसा होईल ह्या हेतूने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत ५ प्रकल्पाकरीता हाफकिन महामंडळ सक्षम असून त्याकरीता शासनाने वित्तीय सहाय्य (रुपये ११००/- कोटी) उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांच्या अहवालात शिफारस करून त्याबाबतचा अहवाल शासनास दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी सादर केलेला आहे.

(२) उच्चाधिकार समितीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत Inactivated Polio Vaccine (IPV), Pentavalent vaccine (DPT+HepB+Hib), Tissue Culture Anti Rabies Vaccine (TCARV), Up-gradation and Modernization of ATS Facility at Pimpri, Pune, Recombinant Factor VIII and Factor IX ह्या पाच प्रकल्पाची शिफारस केलेली आहे.

उपरोक्त प्रकल्पास निधी उपलब्ध करणेसाठी केंद्र शासनाने एच.बी.एल. लि., चेंगलपट्टु यांच्या धर्तीवर महामंडळास Special Purpose Vehicle (SPV) चा दर्जा द्यावा व वितीय्य सहाय्य उपलब्ध करून द्यावे. तसेच महाराष्ट्र शासनाने एकदाच रुपये १००/- कोटी भाग भांडवल वित्तीय सहाय्यता म्हणून उपलब्ध करून देण्याची शिफारस उच्चाधिकार समितीने केलेली आहे.

उक्त प्रमाणे रुपये ११००/- कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत राज्य शासन व महामंडळ स्तरावरून केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, केंद्र शसनाकडून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही. तसेच महाराष्ट्र शासनाकडून रुपये १००/- कोटी वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त पाच प्रकल्पाशिवाय हाफकिन महामंडळाच्या पिंपरी उत्पादन केंद्रामध्ये राष्ट्रहितासाठी सर्पाच्या विषाचे मानकीकरण करण्यासाठीचे राष्ट्रीय केंद्र उभारण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाचे उच्चाधिकार समितीने समर्थन करून “Establishment of Center of Excellence for Snake Venom Standardization and Supply for Manufacturing of Various Antiserum” केंद्र पिंपरी, पुणे येथे स्थापन करण्यासाठी रुपये २३.१० कोटीचा निधी केंद्र शासन (BIRAC) यांचेकडून मंजूर करण्यात आलेला आहे व त्यापैकी प्राथमिक टप्प्यावर रुपये ६.९५४ कोटी एवढा निधी महामंडळास प्राप्त झालेला आहे.

(३) प्रकल्प राबविण्यासाठी निधीची आवश्यकता असून निधी प्राप्त करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि, अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.

राज्य शासनाकडून रुपये १००/- कोटी एवढा निधी प्राप्त करण्यासाठी प्रकल्पाचे तपशिलवार मुल्यांकन करणेसाठी तांत्रिक-आर्थिक व्यवहार्यता अभ्यास/ तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करणे याबाबतची कार्यवाही हाफकिन महामंडळाकडून सुरु आहे.

सर्पाच्या विषाचे मानकीकरण प्रकल्पाचे काम सुरु असून जैवतंत्रज्ञान उद्योग संशोधन सहाय्यता परिषद (BIRAC) यांच्या मार्गदर्शनाखाली महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, चिखली (जि.बुलढाणा) यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत

**(१०) ११८९३ (३०-०३-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, चिखली (जि.बुलढाणा) यांच्या स्थलांतराबाबत व १४ महिने आजारी असल्याने रजेवर असल्याबाबत चौकशी करून त्यांचेकडे असलेला क्षेत्रिय स्तरावरील प्रभार काढण्याकरीता शहर प्रमुख, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, बुलढाणा यांनी दिनांक २३/०८/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना तक्रारीबाबतचे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, चिखली यांनी रजेवर जाऊन चिखली या ठिकाणी आर्थिक लाभासाठी बदली भेटावी यासाठी वरिष्ठ पातळीवर शर्तीचे प्रयत्न केले व चिखली येथे बदली घेऊन कामामध्ये अनेक गैरप्रकार त्यांच्यामार्फत सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदरहू उपअभियंता यांच्या मनमानी व गैरकारभारासंदर्भात चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१२-०५-२०२२) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक ८ मार्च, २०१९ च्या आदेशानुसार श्री.वारे, उपअभियंता यांची ग्रामीण पाणीपुरवठा, नांदुरा उपविभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा येथून ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग गंगाखेड, जिल्हा परिषद, परभणी येथे प्रशासकीय बदली करण्यात आली होती. तथापि, त्यांचे ठिकाणी इतर उपअभियंत्यांची बदलीने पदस्थापना न झाल्याने व उप विभागातील पाणी टंचाई व इतर कामाचा व्याप पाहता प्रशासकीय कामामुळे बुलढाणा जिल्हा परिषदेने श्री.वारे यांना कार्यमुक्त केले नाही.

तद्नंतर दिनांक १९ जून, २०१९ पासून श्री.वारे वैद्यकीय रजेवर गेले व बुलढाणा जिल्हा परिषदेने त्यांना दिनांक २० जून, २०१९ रोजी कार्यमुक्त केले. दिनांक १९ जून २०१९ ते ९ ऑगस्ट, २०२० या कालावधीत श्री.वारे वैद्यकीय रजेवर होते. ते दिव्यांग प्रवर्गातील असून त्यांनी वैयक्तिक व कौटुंबिक कारणास्तव ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, चिखली, जि.बुलढाणा येथे बदली करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक १० ऑगस्ट, २०२० च्या आदेशान्वये त्यांची ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग चिखली, जिल्हा परिषद, बुलढाणा येथे बदली केली असून ते बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्यांना वैद्यकीय मंडळासमोर तपासणीकरीता पाठविण्यात आले. अधिष्ठाता वैद्यकीय मंडळ, औरंगाबाद यांनी श्री.वारे, उप अभियंता यांना वैद्यकीयदृष्टया सेवेकरीता सक्षम ठरविल्याबाबत प्रमाणपत्र दिले आहे.

श्री.वारे, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, चिखली (जिल्हा परिषद बुलढाणा) यांच्या बदली व रजेबाबत शहर प्रमुख, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, बुलढाणा यांनी दिनांक २२ ऑगस्ट, २०२१ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे तक्रार केली होती. तथापि, सदर तक्रार ही गैरसमजुतीने झाली असल्याचे नमूद करुन तक्रारकर्ते यांनी दिनांक १० जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये सदर तक्रार मागे घेतली आहे. मा.श्री.संजय गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी श्री.वारे यांच्या बदली संदर्भात दिनांक २० ऑगस्ट, २०२१ रोजी तक्रार केली होती. तथापि, सदर तक्रार ही गैरसमजुतीतून झाली असल्याचे नमूद करुन, त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्यांची बदली करण्यात येऊ नये असे त्यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर उप अभियंत्यांविरुध्द अन्य कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

## राज्यात विशेषत: पूर्व विदर्भात पाणंद रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत

**(११) १२४२६ (०२-०३-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना कृषी अवजारे शेतात घेवून ये-जा करताना रस्ते उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याने शासनाने मातोश्री पाणंद योजना राबवून तयार केलेले पाणंद रस्ते निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मातोश्री पाणंद रस्ते योजना विदर्भात प्रभावीपणे राबविण्याकरीता किती प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पूर्व विदर्भात पाणंद रस्त्यांची निर्मिती करण्याबाबत तसेच रस्त्यांचा निकृष्ट दर्जा सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०२२ दिनांक ०३ मार्च, २०२२, दिनांक ०९ मार्च,२०२२ अन्वये विदर्भातील सर्व जिल्हे मिळुन सुमारे २६८० कि.मी. च्या शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखड्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत केलेल्या कामांचा निधी साहित्य पुरवठा धारकांना देण्याबाबत

**(१२) १२४७९ (०२-०३-२०२२) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सिमेंट रोड, नाली बांधकाम, मोरी बांधकाम इत्यादी कुशल कामे चार वर्षापूर्वी पूर्ण होऊनही सदरहू कामांचा करोडो रुपयाचा निधी साहित्य पुरवठा धारकांना प्राप्त झाला नसल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामांचा निधी उपलब्ध करुन साहित्य पुरवठा धारकांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-०३-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) उप जिल्हाधिकारी (रोहयो), गडचिरोली या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपग/मग्रारोहयो कक्ष/०७/२०२२ दिनांक ०४ जानेवारी, २०२२ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आरमोरी तालुक्यातील ५० कामांचे रुपये २०८.४७ लक्ष निधी मागणीचे प्रस्ताव तयार करुन मा.आयुक्त (नरेगा), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करण्यात आले. केंद्र शासनाने, केंद्र पुरस्कृत योजनांची सर्व प्रदाने ही PFMS प्रणालीव्दारेच करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे तसेच सदरची प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत पुढील निधी उपलब्ध होणार नाही असे राज्य शासनास कळविले आहे. त्यामुळे सदरची प्रक्रीया पूर्ण करण्यासाठीची कार्यवाही राज्य स्तरावर चालू आहे. त्याअनुषंगाने राज्य स्तरावरून निधी मागणीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.
(३) लागू नाही.

---

## कालवा सल्लागार समितीच्या बैठका स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत घेण्याबाबत

**(१३) १२६४७ (३०-०३-२०२२) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कालवा सल्लागार समितीच्या बैठका मंत्री स्तरावर होत असल्यामुळे त्यांच्या कामकाजाच्या व्यस्ततेमुळे बैठका वेळेवर होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रब्बी हंगामातील पिकांना पाण्याचे नियोजन वेळेवर करता येत नसल्यामुळे या बैठका स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत त्या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पुर्वीप्रमाणेच घेण्यात याव्यात अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालवा व सल्लागार समितीच्या बैठका पूर्वीप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१३-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) याअनुषंगाने श्री.आशुतोष अशोकराव काळे, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांचे एकमेव निवेदन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक या कार्यालयास प्राप्त आहे.
(३) शासन निर्णय क्र.कासस-२०१५/(१६२/२०१५)/ सिंव्य(म) दिनांक १८/०३/२०१६ मधील तरतुदीनुसार हंगाम निहाय कालवा सल्लागार समितीच्या बैठका नियमीतपणे घेण्यात येत असल्याने याबाबत अन्य कोणतीही कार्यवाही आवश्यक नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे स्वास्थ्य प्रमाणपत्राकरीता गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१४) १२८२५ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे शस्त्र परवाना घेण्यासाठी लागणाऱ्या स्वास्थ्य प्रमाणपत्राकरीता दलाली द्यावी लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदर गैरप्रकार होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१८-०५-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आनंदवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१५) १२९२२ (०४-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनंदवाडी (ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग) येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत सातव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करूनही दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या दिनांक ३१ मार्च, २००७ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करूनदेखील शासनाकडून सन २००५-२००६ अखेरपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने सदर बाब सातत्याने सभागृहात उपस्थित केल्यानंतर तत्कालीन शासनाने सन २००५-२००८ या तीन आर्थिक वर्षात मिळून एकूण १५ कोटी ६९ लाख ९ हजार केल्यानंतर इतकी आर्थिक तरतूद सदर प्रकल्पाच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन पतन अभियंता, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १२ आक्टोबर, २००७ रोजी कंत्राटदार मे आर. बी. चव्हाण गोरेगाव, मुंबई यांना कार्यारंभ आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ डिसेंबर, २००७ रोजीपासून ठेकेदारांकडून या प्रकल्पाच्या तीन टप्प्यापैकी पहिल्या टप्प्याच्या कामास सुरूवात होऊन पहिल्या टप्प्याच्या भरावाच्या कामासाठी रुपये ५ कोटी १७ लाख ३३ हजार इतका निधी शासनाकडून खर्च करण्यात आला व माहे मे,२००८ अखेर पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाल्यानंतर, स्थानिकांनी प्रस्तावित आराखड्यास विरोध दर्शविल्यामुळे काम बंद पडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम पुन्हा सुरू करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांबरोबर चर्चा केल्यानंतर पुन्हा केंद्र सरकारकडे रुपये ९२.५० कोटी अंदाजित खर्चाचा सुधारित प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी राज्य सरकारकडून सादर करण्यात आला व या सुधारित प्रस्तावास केंद्र सरकारने दिनांक २८ मार्च २०१८ रोजी मंजूरी दिल्यानंतर त्यानुषंगाने, राज्य शासनाने, सुधारित

अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून रूपये २६ कोटी ८ लाख ७० हजार इतक्या रकमेची तरतूद केली व त्यानुसार पुन्हा सदरहू मत्स्यव्यवसाय बंदर प्रकल्पाचे काम सुरू होऊन पुन्हा एकदा मागील ६ महिन्यांपासून सदरहू प्रकल्पाचे काम बंद पडले आहे, हेही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू मत्स्यव्यवसाय बंदराच्या उभारणीचे काम पूर्ण करण्यासंदर्भातील निवेदन दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी तहसिलदार, देवगड यांचेकडे मच्छिमार संस्थांनी, मच्छिमारानी सादर केले आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आनंदवाडी मत्स्यव्यवसाय बंदर उभारणीचे अपूर्णावस्थेत बंद असलेले काम विनाविलंब हाती घेऊन जलदगतीने पूर्ण करून सदर बंदर लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (११-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाने दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये आनंदवाडी मत्स्यबंदराच्या रुपये ८८.४४ कोटी इतक्या प्रकल्प किंमतीच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

दिनांक २२/०९/२०२१ रोजी विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीसमोरील सादरीकरणावेळी आनंदवाडी मत्स्यबंदराच्या ठिकाणी भरावाच्या कामात वाढ झाल्याचे निदर्शनास आले. सदर वाढीव परिमाणाच्या खर्चाबाबत खात्री करण्यासाठी दिनांक १७/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली होती.

सदर समितीने आपला अहवाल दिनांक २८/०२/२०२२ रोजी सादर केला असून समितीच्या अहवालानुसार निधी वितरणाबाबत उचित कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे आहे.

(५) आनंदवाडी मत्स्यबंदरासाठी निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (ता.उरण, जि रायगड) येथून सागरी मार्गाने मुंबईला जाणाऱ्या येणाऱ्या मोरा जेटीची दुरावस्था झाल्याबाबत

**(१६) १२९२५ (०४-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (ता.उरण, जि रायगड) येथून सागरी मार्गाने मुंबईला येण्यासाठी प्रवासी वाहतूकीकरीता १८९६ साली मोरा येथे जेटी बांधण्यात आली असून मागील दोन वर्षापासून मोरा जेटीची तसेच तेथील स्वच्छतागृहाची अत्यंत दुरवस्था झाल्याने प्रवाशांचे स्वच्छतागृहाअभावी हाल होत असल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू मोरा बंदराच्या जेटीची झालेली दुरवस्था सुधारण्याच्यादृष्टीने तसेच स्वच्छतागृहाची दुरुस्ती करून तेथे नियमित सफाई करण्याकरीता व रोगराई पसरु नये यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०७-०३-२०२२) :** (१) व (२) मोरा येथील प्रवासी जेट्टी, वाहनतळ व स्वच्छतागृह सुस्थितीत आहेत. सन २०२१-२०२२ ह्या आर्थिक वर्षामध्ये मोरा जेट्टीची किरकोळ दुरुस्ती करणे व प्रसाधनगृहाची दुरुस्ती करण्याचे काम मंजूर झाले असून सद्य:स्थितीत सदर कामाची निविदा प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली (जि रत्नागिरी) तालुक्यातील पांगरी, भोपण व दाभिळ खाडीत सक्शन पंपाद्वारे बेकायदेशीररित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१७) १३२७० (०४-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)दापोली (ता.दापोली, जि.रत्नागिरी) तालुक्यातील पांगरी, भोपण, दाभिळ खाडीत ६ ठिकाणी सक्शन पंपाने बेकायदेशीरपणे मागील वर्षापासून वाळूमाफियांकडून वाळू उपसा, वाळू वाहतूक होत असल्याने या परिसरातील ग्रामस्थांनी तहसिलदार, दापोली, जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे सातत्याने तक्रारी करूनही महसूल प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापोली येथे २ वर्षापूर्वी आंजर्ले खाडी किनाऱ्यावर पडलेल्या खडशावरून मोठी कारवाई महसूल प्रशासनाने केलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळू माफियाकडून क्रेन मशिनच्या सहाय्याने तसेच अन्य मशिनरी वापरून या खाडीतून उपसलेल्या वाळूचे डंपर काही ग्रामस्थांनी अडवून त्याची माहिती स्थानिक महसूल प्रशासनाला दिली असतानाही याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाडीभागात ६ ठिकाणी होणाऱ्या वाळू उपसा कायमस्वरूपी बंद करण्याच्यादृष्टीने तसेच वाळू माफियाविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१४-०३-२०२२) :** (१) माहे डिसेंबर,२०२१ मध्ये अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती. तत्पुर्वीच तहसिलदार, दापोली यांनी पांगरी, भोपण, दाभिळ परिसरामध्ये अनधिकृत वाळू प्रकरणी २ सक्शनपंप व इतर साहित्य जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे. तसेच ६ विविध ठिकाणी ३५ ब्रास वाळूसाठा जप्त करुन दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(२) आंजर्ले खाडीकिनारी पडलेल्या खडशाची पाहणी करतांना १५४० ब्रास वाळूची चोरी झाल्याचे निदर्शनास आल्याने दापोली पोलीस ठाण्यात दिनांक २४/०४/२०२१ रोजी गु.र.नं.७९/ २०२१ अन्वये ५ व्यक्तीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दापोली तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी तालुकास्तरावर तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार यांचे बैठे व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे.

दापोली तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १७ प्रकरणी रुपये ३९,०८,९००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ३ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर ८०.५० ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला आहे. तसेच ३ बोटी सक्शन पंपासह जप्त करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक शहरातील ‘जहान’ इंटरनॅशनल टूरच्या मालकाने फसवणूक केल्याबाबत

**(१८) १३३१५ (०४-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील ‘जहान’ इंटरनॅशनल टूरचे मालक अब्दुल मतिन मनियार व त्याच्या साथीदारांनी हज-उमराह यात्रेच्या आयोजनाकारीता राज्यभरातील शेकडो मुस्लिम भाविकांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याचे २ वर्षापूर्वी निदर्शनास आल्यानंतर हज-उमराह यात्रेकरू कृती समिती व मुस्लिम भाविकांनी नाशिक शहरातील मुंबईनाका पोलीस स्टेशन तसेच गुन्हा अन्वेषण शाखा, नाशिक यांचकडे रितसर तक्रारी दाखल केल्या होत्या, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उपरोक्त तक्रार दाखल झाल्यानंतर २ वर्षाहून अधिक कालावधी होऊनही संबंधित गुन्हेगारांविरोधात कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले, तसेच सदर प्रकरणाचा तपास करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोटयवधी रूपयांची फसवणूक करणाऱ्या संबंधिताविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे ०३ गुन्हे दाखल आहेत:

अ) ५७/२०१९, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४, १२०(ब), दिनांक ०९/०२/२०१८.

ब) २६७/२०१८, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४, १२०(ब), दिनांक १२/०९/२०१८.

क) १८१/२०२१, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, दिनांक १३/०८/२०२१.

सदर गुन्ह्यांत आरोपी अब्दुल मतीन मनीयार हा गुन्हा दाखल होण्यापूर्वीपासूनच परदेशात वास्तव्यास असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

गुन्हा क्रमांक २६७/२०१८ या गुन्ह्यात एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्या विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर तीनही गुन्ह्यांत पुढील तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना जीवे मारण्याच्या धमकीबाबत

**(१९) १३३७६ (०४-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी कंत्राटदारांच्या धमक्यांमुळे जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवान्यासाठी अर्ज केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोटा अॅट्रॉसिटीचा गुन्हाही दाखल होऊ शकतो, अशी भिती देखील कार्यकारी अभियंता यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना पाठविलेल्या पत्रात व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (११-०३-२०२२) :** (१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना कंत्राटदारांकडून कोणत्याही प्रकारची धमकी प्राप्त झालेली नाही. तथापि, त्यांनी स्वसंरक्षणार्थ शस्त्र परवान्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे अर्ज केला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना कोणत्याही कंत्राटदारांकडून धमकी प्राप्त झालेली नसल्यामुळे कंत्राटदाराविरुध्द गुन्हा दाखल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(२०) १३३९१ (२८-०२-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यामधील कॉरीडॉर, रूम व लॉकरमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनास दिल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील एकूण १०८९ पोलीस ठाण्यांपैकी ५४७ पोलीस ठाण्यांमध्ये आजमितीस सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील उर्वरित पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (११-०३-२०२२) :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यामधील प्रत्येक कॉरीडॉर, रुम व लॉकअप यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आदेश दिले आहेत.

(२) होय.

(३) पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत प्रकल्पाच्या कामकाजाचे कार्यादेश दिनांक ०४/११/२०२० व दिनांक १०/११/२०२० रोजी देण्यात आले.

राज्यातील १०८९ पोलीस ठाण्यांपैकी ५४७ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम दिनांक ३०/०७/२०२१ रोजी पूर्ण झाले आहे तर उर्वरित ५४२ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणेच्या वायरिंग आणि केबल टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच ५४२ पोलीस ठाण्यांचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित सेवा पुरवठादारांना (System Integrator) देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.